प्रेस नोट दिनांक २२/०६/२०२३

श्री. अश्विन चंद्रकिशोर नंदगवळी, वय. ३३ वर्षे, तलाठी सजा नांदीवसे, अति. कार्यभार पिपळीखुर्द, तिवरे, ता. चिपळुण जि. रत्नागिरी यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | चिपळुण पोलीस ठाणे गु.रजि.नं. /२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **श्री. अश्विन चंद्रकिशोर नंदगवळी, वय. ३३ वर्षे, तलाठी सजा नांदीवसे, अति. कार्यभार पिपळीखुर्द, तिवरे, ता. चिपळुण जि. रत्नागिरी** |
| मागितलेली लाचेची रक्कम | ४५,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४५,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार व त्यांचे सहहिस्सेदार यांचे सामाईक बिनशेती जमीनीचे दोन समान हिस्से करुन उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण यांचेकडुन बिनशेती विभाजनाचे आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता ४५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०१/०६/२०२३ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक अश्विन चंद्रकिशोर नंदगवळी यांनी ०तक्रारदार यांचेकडे उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण येथील कर्मचारी यांचेकरीता ४०,०००/-रुपये व मंडळ अधिकारी कळकवणे यांचेकरीता ५,०००/-रुपये असे एकुण ४५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन मागणी केलेली लाच रक्कम ४५,०००/-रुपये स्विकारणार असल्याचे मान्य केल्याचे पडताळणीत निष्पन्न झालेले आहे.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार व त्यांचे सहहिस्सेदार यांचे सामाईक बिनशेती जमीनीचे दोन समान हिस्से करुन उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण यांचेकडुन बिनशेती विभाजनाचे आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता उपविभागीय अधिकारी कार्यालय चिपळुण येथील कर्मचारी यांचेकरीता ४०,०००/-रुपये व वेगळा सातबारा देण्यासाठी मंडळ अधिकारी कळकवणे यांचेकरीता ५,०००/-रुपये असे एकुण ४५,०००/-रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर श्री. अश्विन चंद्रकिशोर नंदगवळी तलाठी सजा पिंपळीखुर्द यांना दिनांक २२/०६/२०२३ रोजी १२.२३ वाजता ग्रामपंचायत कार्यालय पिंपळीखुर्द येथील तलाठी कार्यालय पिंपळीखुर्द येथे पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे.<br>सदरची सापळा कारवाई पोलीस निरीक्षक श्री. प्रविण ताटे पोलीस हवालदार संतोष कोळेकर, पोलीस शिपाई हेमंत पवार, राजेश गावकर व चालक पोलीस नाईक प्रशांत कांबळे, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी यांनी केली आहे. |

मार्गदर्शन अधिकारी- मा. सुशांत बं. चव्हाण, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी

तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र विभाग यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेतस्थळ - acbratnagiri@gmail.com

टोल फ्रि नंबर- १०६४/ दुरध्वनी क्रमांक- ०२३५२-२२२८९३

१) श्री. सुशांत बं. चव्हाण, पोलीस उप अधीक्षक लाप्रवि रत्नागिरी - ९८२३२३३०४४

२) श्री. प्रविण आ. ताटे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि रत्नागिरी - ८०५५०३४३४३

३) श्री. अनंत कांबळे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि रत्नागिरी - ७५०७४१७०७२


पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी, सत्यमेव जयते

प्रविण आ.ताटे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी.